# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारक
# घटक १ : प्रारंभिक सुधारक
# ३) डॉ बाबासाहेब आंबेडकर

**प्रास्ताविक**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू येथे झाला त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली जवळचे आंबवडे व मूळ नाव भिमराव आहे. त्यांच्या आईचे नाव भिमाबाई वडिलांचे नाव रामजी आहे. त्यांच्या पत्नीचे नाव रमाबाई व मुलाचे नाव यशवंत आहे. डॉ आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण सातार्‍यात झाले. एलफिन्स्टन हायस्कूल मुंबई येथून मॅट्रिक व एलफिन्स्टन कॉलेजातून बीए झाले त्यांना बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली होती. पुढे डॉ आंबेडकर कोलंबिया विद्यापीठात (अमेरिका) १९१५ मध्ये पीएचडी झाले. लंडनयेथून बीएस्सी झाले. मुंबईत सिडनेहॅम कॉलेजमध्ये डॉ आंबेडकर प्राध्यापक झाले. पुढे लंडनला जाऊन १९२३ मध्ये बॅरिस्टर झाले. डॉ आंबेडकरांनी पुढे आयुष्यभर अस्पृश्यता उच्चाटनासाठी कार्य केले. ०६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे निधन झाले.

डॉ आंबेडकरांनी वंचितांना बंधमुक्त करण्यासाठी त्यांना जागृत व संघटित केले. शिक्षण प्रसारातून त्यांच्यामध्ये आत्मसन्मान निर्माण करत जगण्याची नवी उमेद दिली. डॉ आंबेडकरांचे कार्य अतुलनीय व प्रचंड व्यापक व प्रभावशाली आहे. त्यांचे समाज सुधारणेत योगदान खूप मोलाचे आहे. त्यांच्या सुधारणा कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे

**डॉ आंबेडकरांचे विचार व कार्य**

आंबेडकरांनी आपले आयुष्य समाज कार्यासाठी वेचले. जगभर त्यांचे विचार व कार्य प्रेरक व क्रांती घडविणारे ठरले. डॉ आंबेडकर अस्पृश्यता हा मानवतेवरील कलंक मानत. हा कलंक मानवनिर्मित आहे असे त्यांचे मत होते. डॉ आंबेडकर मानवी जीवनात धर्म आवश्यक संस्था मानतात. धर्म माणसाच्या विकासाचे साधन मानतात. अर्थात धर्म बुद्धिनिष्ठ व नैतिक असावा असे त्यांचे मत होते. स्वातंत्र्य समता बंधुता व न्याय यांचा अविष्कार करणार्‍या धर्माचा ते पुरस्कार करतात. जातिव्यवस्थेमुळे शोषण व सामाजिक संबंध बिघडले असल्यने डॉ आंबेडकर अनैसर्गिक जातिव्यवस्थेतील दोषांवर त्यांनी टीका केली. आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी खर्च केले. पददलितांच्या आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या. आपल्या विचारातून त्यांनी भरीव व्यापक कार्य केले. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आंबेडकरांनी संघटित सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला त्यांनी केलेले सुधारणा कार्य पुढीलप्रमाणे ...

**१) साउथबरो समितीसमोर साक्ष**

दलितांच्या हक्कासाठी डॉक्टर आंबेडकरांनी धोरणात्मक लढाही दिला. १९१९ सुधारणा कायद्यानुसार भारतीयांना काही प्रमाणात राजकीय हक्क देण्यासाठी लॉर्ड साउथ बरो यांच्या अध्यक्षतेत एक समिती ब्रिटिश

सरकारने भारतात पाठविली. या समितीसमोर डॉ आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्काबाबतची मागणी केली. त्याबाबतचे आपले निवेदन सादर केले. हीच अस्पृश्यांच्या राजकीय हक्काच्या चळवळीची सुरुवात मानली जाते. अस्पृश्यांना मतदानाचा निवडणूक लढविण्याचा हक्क असावा त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र मतदार संघ असावेत अशा मागण्या डॉक्टर आंबेडकरांनी या समितीसमोर केल्या.

**२) माणगाव परिषद**

कागल जहागिरीतील माणगाव येथे राजर्षी शाहू महाराजांच्या सहकार्याने डॉ आंबेडकरांच्या अध्यक्षतेत २० व २१ मार्च १९२० रोजी अस्पृश्यता निवारण परिषद झाली. या परिषदेत शाहू महाराजांनी डॉ आंबेडकरांना दलितांचा नेता म्हणून घोषित केले. पुढे दीर्घकाळ डॉ आंबेडकरांनी या न्यायाच्या, समतेच्या चळवळीला दिशा दिली व तिचे नेतृत्व केले.

**३) बहिष्कृत हितकारणी सभा**

दलित जागृती व समाजाच्या समस्या सरकार दरबारी मांडण्यासाठी एखादे मंडळ असावे असा डॉ आंबेडकरांचा विचार होता त्यासाठी ९ मार्च १९२४ रोजी परळ मुंबई येथे एक सभा बोलाविण्यात आली होती. या सभेतील ठरावानुसार २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन करण्यात आली. दलित चळवळीतील या सभेचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. शिका संघटित व्हा व संघर्ष करा हे या सभेचे ब्रीदवाक्य होते. जाणीव जागृती करणे, शिक्षण प्रसार, आर्थिक स्वावलंबित्व या अनुषंगाने डॉ आंबेडकरांच्या नेतृत्वात या सभेने कार्य केले.

**४) समाज समता संघ**

४ सप्टेंबर १९२७ रोजी डॉ आंबेडकरांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली समाज समता संघ नावाच्या संस्थेची स्थापना केली . या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांत अस्पृश्यांसह स्पृश्यही होते . या संस्थेतर्फे त्यांनी रोटीबंदी व बेटीबंदी तोडण्याकरिता काम करण्याचे ठरविले.

**५) चवदार तळ्याचा सत्याग्रह**

त्या काळातच त्यांना सार्वजनिक पाणवठे मंदिर येथे प्रवेश दिला जात नव्हता तेव्हा सीके बोले यांनी मुंबई प्रांतात विधिमंडळात असा ठराव मांडला होता की अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारणाऱ्या खाजगी व सरकारी संस्थांची अनुदाने बंद करावीत या ठरावाप्रमाणे महानगरपालिकेने येथील चवदार तळे अस्पृश्यांना खुले करण्याचा ठराव केला पण प्रत्यक्षात लोकांनी त्याला विरोध त्यामुळे २० मार्च १९२७ रोजी डॉ आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो अनुयायांनी तळ्यात प्रवेश केला व चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले झाले साठी केलेला हा पहिला यशस्वी सत्याग्रह होता

**६) मनुस्मृति दहन**

अस्पृश्यता विरोधी लढा तीव्र करण्यासाठी आंबेडकरांनी २५ व २६ डिसेंबर १९२० अस्पृश्य परिषद घेतली या ठिकाणी त्यांनी मनुस्मृती या ग्रंथाचे दहन केले मनुस्मृति हा प्राचीन हिंदू धर्मग्रंथ असून तो ग्रंथ वर्णव्यवस्था

व जातीव्यवस्था उगम मानला जात होता या ग्रंथाने व जातीव्यवस्थेला जन्म दिला त्या ग्रंथाची सामुदायिक होळी करून त्यातील विचारांना तीव्र विरोध केला

**७) मंदिर प्रवेश सत्याग्रह**

अस्पृश्यांना हिंदू मंदिरांमध्ये प्रवेश दिला जात नव्हता याची आंबेडकरांना खूप चीड होती अस्पृश्य जर हिंदू समाजाचा घटक आहेत तर त्यांना मंदिरात प्रवेश का नाही असा प्रश्न उपस्थित करून असंख्य अनुयायांसह आंबेडकरांनी देशव्यापी सत्याग्रह केले पर्वती सत्याग्रह १९२९ गणेश मंदिर नाशिक सत्याग्रह १९३१ काळाराम मंदिर अमरावती सत्याग्रह १९३५ अंबाबाई मंदिर मंदिर सत्याग्रहामुळे अस्पृश्यांना आत्मिक बळ मिळाले दलित चळवळ अधिक गतिमान झाली

**८) शैक्षणिक कार्य**

डॉ आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तन घडविण्याची शिक्षणाची ताकद ओळखून 'शिका संघटीत व्हा आणि संघर्ष' करा असा संदेश देत कार्य केले. शिक्षण विकासाला महत्त्व दिले. शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी बहिष्कृत हितकारणी सभा स्थापना केली. बहिष्कृत हितकारिणी सभावतीने वाचनालय व प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. १९४० मध्ये त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेची स्थापना केली व दलितांच्या उच्च शिक्षणाला गती दिली या संस्थेने छत्रपती संभाजीनगर येथे मिलिंद कॉलेज व मुंबईला सिद्धार्थ कॉलेज सुरू केले यामुळे दलितांच्या शैक्षणिक विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली व ते अन्यायाचा प्रतिकार करू लागले. पुरुषांप्रमाणे स्त्री शिक्षणाचाही त्यांनी पुरस्कार केला. केवळ उपजीविकेसाठी नाही तर बंधमुक्तीचे मध्यम म्हणून डॉ आंबेडकरांनी शिक्षणाचा पुरस्कार व प्रसार केला.

**९) लेखनातून जागृती (वृत्तपत्र व ग्रंथ)**

अस्पृश्यांवरील अन्याय दूर करणे, दलित चळवळ शक्तिशाली बनविणे यासाठी आंबेडकरांनी लेखन केले. त्यांचे लेखन प्रामुख्याने सामाजिक समता, अर्थशास्त्र, राज्यघटना, धर्म आणि इतिहास या विषयांवर आधारित आहे. त्यांच्या लेखनात प्रामुख्याने शोषित, पीडित, महिला आणि कामगारांच्या हक्कांसाठी लढा दिसून येतो. त्यांचे लेखन हे तार्किक, तथ्यपूर्ण आणि मानवी मूल्यांवर आधारित आहे.

जातीचा विनाश (Annihilation of Caste), बुद्ध आणि त्यांचा धर्म (The Buddha and His Dhamma), रुपयाचा प्रश्न आणि त्याचा उगम व उपाय (The Problem of the Rupee: Its Origin and Its Solution), शुद्र कोण होते, पाकिस्तान किंवा भारताची फाळणी या ग्रंथांचे लेखन डॉ आंबेडकर यांनी केले.

अधिक लोकांपर्यंत आपले विचार पोहोचवून लोकांमध्ये जागृती घडविण्यासाठी डॉ आंबेडकरांनी वृत्तपत्रांचाही उपयोग केला. १९२० मध्ये शाहू महाराजांच्या आर्थिक मदतीतून मूकनायक नावाचे वृत्तपत्र सुरू केले १९२७ मध्ये बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरु केले. १९२८ मध्ये समता वृत्तपत्र काढले. याशिवाय आंबेडकरांनी जनता आणि प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रही चालविली. या सर्व वृत्तपत्रातून त्यांनी मांडलेले विचार अत्यंत परिवर्तनवादी होते यावरून त्यांची झुंजार पत्रकारिता दिसून येते.

**१०) वंचितांच्या उद्धारासाठी राजकारण**

डॉ आंबेडकर कायदेमंडळाचे सदस्य, कायदामंत्री होते त्यांनी अस्पृश्यांच्या उत्थानासाठी केलेले प्रयत्न कमालीचे होते. ब्रिटीश सरकारने भारतीयांना कायदेमंडळात कसे स्थान द्यायचे यावर विचार करण्यास लंडनला

गोलमेज परिषदा घेतल्या. त्यास अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ आंबेडकर हजर होते. त्यांनी यावेळी स्वतंत्र मतदारसंघ मिळावा यासाठी प्रयत्न केले. ब्रिटिशांनी पुढे जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिला. दलितांना हिंदूंपासून फोडण्याचा सरकारचा प्रयत्न म्हणून गांधीजींनी त्याला विरोध केला व येरवडा तुरूंगात आमरण उपोषण सुरू केले तेव्हा आंबेडकरांनी गांधींची भेट घेतली दोघांमध्ये चर्चा झाली व पुणे करार झाला या करारानुसार स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला दलितांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली गेली. दलितांना राजकारणात संधी मिळावी म्हणून आंबेडकरांनी १९३५ मध्ये स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. नंतर त्यांनी अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष काढला त्यांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष स्थापन केला. थोडक्यात डॉ आंबेडकर वंचित दलितांच्या उद्धारासाठी राजकीय क्षेत्रातही कार्य करताना दिसतात. पुढे डॉ आंबेडकर भारतीय घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे भारतीय घटना निर्माण झाली. म्हणून त्यांना घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते.

**समारोप**

डॉ आंबेडकर यांना समाजजीवन आणि अर्थकारणाची सखोल माहिती होती. त्यांनी अस्पृश्यता निवारण, महिला बंधमुक्ती, वंचितांचे लढे यासाठी मोलाचे, दिशादर्शक व क्रांतिकारी कार्य केले. भारतीय राज्यघटनेचे ते शिल्पकार आहेत. डॉ आंबेडकर थोर समाजसुधारक होते. त्यांनी शिक्षण व कायद्याच्या आधारे वंचितांचे उत्थान घडवून आणले. डॉ आंबेडकर उदारमतवादी व प्रखर राष्ट्रभक्तही होते. ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महानिर्वाण झाले. डॉ आंबेडकरांच्या कार्याबद्दल डॉ साळवे डॉ आंबेडकरांचे सामाजिक योगदान या लेखात म्हणतात '... तळागाळातील सर्वसामान्य माणूस सर्वशक्तिनिशी जागा केला त्याला आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता व सामर्थ्याची जाणीव करून दिली. मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले हक्काने जगण्याचे शिकविले. त्यासाठी संघर्षाचे सत्याग्रह करून समता व न्याय समाजात निर्माण केले.'